नाशिक महानगरपालिका, नाशिक.
Rajeev Gandhi Bhavan, Sharanpur Road, (Post Box no.12), Nashik-422 002.
Visit us at : www.nmc.gov.in E-mail: dmc_lic@nmc.gov.in ph.no. 0253-2222476

जा. क्र.जापवि/कक्ष-१/ १५४ /२०२१
दिनांक :- १४/०३ /२०२१
NMC/DTD/OWL/२०२१/

प्रति,
विभागीय अधिकारी, सर्व
नाशिक महानगरपालिका, नाशिक

**विषय:-** शहरातील कोरोना विषाणू (COVID-१९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना अंतर्गत **हॉटेल/ रेस्टॉरंटमध्ये** नियमांचे पालन करणेबाबत..

**वाचा** :-१.आपत्ती व्यवस्थापन कायदा, २००५ चे कलम ३०,३३, ३४, ४१ व कलम ५१.
२.पर्यटन संचालनालय, महाराष्ट्र शासन यांचेकडील दि.७ ऑक्टोंबर, २०२० रोजीचे मार्गदर्शक सूचना
३.महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील अधिसूचना क्रमांक:करोना २०२०/ प्र.क्र.५८/ आरोग्य-५, दि.१३/०३/२०२०, दि.१४/०३/२०२०.
४.मा. मुख्य सचिव , महाराष्ट्र राज्य यांचे कडील आदेश क्र.डीएमयु/२०२०/सीआर,९२/डीआयएसएम-१ दि.१४ फेब्रुवारी, २०२१.
५.जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, नाशिक यांची दि.०८/०३/२०२१ रोजी झालेली बैठक.
६.मा. जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, नाशिक यांचेकडील - क्र. कक्ष/कोरोना विषाणू/७६/२०२१ दि.०८/०३/२०२१

शासनाने कोरोना विषाणुचा (COVID-19) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा, १८९७ दिनांक १३ मार्च, २०२० पासून लागू करुन खंड २, ३ व ४ मधील तरतुदीनुसार अधिसूचना निर्गमित केलेली आहे. सदर अधिसूचनेनुसार प्रतिबंधात्मक उपाय योजना करण्यासाठी क्षेत्र प्रतिबंधित करण्याकरीता महानगरपालिका आयुक्त यांना सक्षम प्राधिकारी म्हणून प्राधिकृत करण्यात आलेले आहे.

मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांनी संदर्भिय क्र. ४ मधील दि.१४/०२/२०२१ रोजीच्या आदेशान्वये **मिशन बिगीन अगेन** अंतर्गत साथरोग प्रतिबंधात्मक कायदा, १८९७ तसेच आपत्ती व्यवस्थापन कायदा, २००५ अन्वये संपूर्ण महाराष्ट्र राज्याचे क्षेत्रात कोरोना विषाणू (COVID-19) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना अंतर्गत निर्बंध सुकर करणे तसेच टप्प्याटप्प्याने टाळेबंदी उघडणेबाबत (Easing of Restrictions and Phase-wise opening of Lockdown.) निर्देश दिलेले असून, लॉकडाऊन (Lockdown) चे आदेशास दि.३१/०३/२०२१ पर्यंत काही अटी व शर्तीचे अधिन राहून महाराष्ट्र राज्यात अधिसूचना जाहीर करण्यात आलेली आहे.

संदर्भिय क्र.५ च्या बैठकीत नाशिक जिल्हयातील कोविड-१९ बाबत वाढत्या रुग्ण संख्येचा आढावा घेण्यात आला असता, सद्यस्थितीमध्ये कोविड-१९ चे मोठया प्रमाणावर वाढत असलेल्या रुग्ण संख्येवर आळा घालण्यासाठी उपाययोजना करण्याचे अगत्याचे झालेले आहे. ही बाब विचारात घेवून याबाबत प्रतिबंधात्मक उपाययोजनांच्या स्वरुपाची रुपरेषा निश्चित करण्यात आलेली असून, त्याबाबत संदर्भिय क्र. ६ अन्वये नाशिक जिल्हयांमध्ये निर्बंध लागू करणेत आलेले आहेत.

संदर्भिय क्र.६ मध्ये निर्देशित केलेप्रमाणे, खाद्यगृहे, हॉटेल, रेस्टॉरंट , परमिट रुम/ बार फक्त सकाळी ७.०० ते रात्रौ ०९.०० या कालावधीत कोविड-१९ चे मार्गदर्शक तत्वांचे यथोचित पालन करुन ५० टक्के टेबल्स क्षमतेने सुरु राहतील. तसेच, होम डिलीव्हरी चे किचन / वितरण कक्ष रात्रौ.१०.०० वा. पावेतो सुरु ठेवण्यास परवानगी देणेत आलेली आहे. तसेच, प्रत्येक शनिवार व रविवार या दिवशी शहरातील सर्व दुकानांचे बंदचे निर्बंधातून या सेवांना वगळण्यात आलेले आहे.

मात्र, शनिवार दि.१३/०३/२०२१ रोजी शहरातील काही हॉटेल्स/ रेस्टॉरंटची पाहणी केली असता, त्या ठिकाणी ५० टक्के पेक्षा जास्त क्षमतेने टेबल्स सुरु असणे, Themometer, Thermal Scarnner/ Gun ची व्यवस्था नसणे, सॅनिटाईझरची व्यवस्था नसणे, प्रतिक्षालयातील गिऱ्हाईक तसेच कर्मचारी यांनी मास्क न घालणे, सामाजिक सुरक्षित अंतर न ठेवणे इत्यादी कोविड-१९ चे मार्गदर्शक तत्वांचे यथोचित पालन केलेले आढळून आलेले नाही. त्यामूळे संबंधितांवर दंडात्मक स्वरुपाची कारवाई करणेत आलेली आहे.

Scanned by CamScanner

कोरोना विषाणुचा होणारा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा एक भाग म्हणून साथरोग प्रतिबंधात्मक कायदा, १८९७ अन्वये निर्गमित करण्यात आलेली अधिसूचना व नियमावली मधील तरतुदीनुसार नाशिक महानगरपालिका क्षेत्रात सदरचे निर्बधांचे पालन करुनच, खाद्यगृहे, हॉटेल, रेस्टॉरंट, परमिट रुम/ बार यांना परवानगी देण्यात आलेली आहे. त्यामूळे शासनाकडील कोविड-१९ चे संदर्भिय क्र.२ चे मार्गदर्शक तत्वांचे यथोचित सूचनांचे पालन करणे अनिवार्य आहे.

शहरातील कोरोना विषाणुचा (COVID-19) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी खाद्यगृहे, हॉटेल, रेस्टॉरंट, परमिट रुम/ बार मध्ये विशेषत: शुक्रवार/ शनिवार/ रविवार या दिवशी शासनाकडील तसेच, मनपाकडील मार्गदर्शक सूचनांचे पालन होते किंवा नाही याची तपासणी करणेकामी विभागीय स्तरावर तपासणी पथकाची स्थापना करणेत यावी. सदरच्या तपासणी पथकामार्फत सायंकाळी ७.३० ते रात्री ९.३० वाजेच्या दरम्यान मार्गदर्शक सूचनांचे पालन न करणाऱ्या संबंधितांवर दंडात्मक स्वरुपाची कारवाई करणेत यावी.

वरील प्रमाणे काटेकोरपणे पालन करण्याची व त्यास व्यापक स्वरुपात प्रसिध्दी देणेची जबाबदारी सर्व संबंधितांची राहील.

१५/०३/२०२१

(कैलास जाधव)
आयुक्त
नाशिक महानगरपालिका, नाशिक

**प्रत माहितीसाठी / उचित कार्यवाहीस्तव :**

१. मा. जिल्हाधिकारी,नाशिक तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,नाशिक
२. मा. पोलीस आयुक्त,नाशिक शहर
३. सर्व विभागप्रमुख, नाशिक महानगरपालिका, नाशिक
४. जनसंपर्क अधिकारी, नाशिक महानगरपालिका, नाशिक

Scanned by CamScanner